शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## मनोरंजन कर आणि ‘स्थानिक प्राधिकरणां’ची अनास्था

**जालना । प्रतिनिधी -** महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे साधन म्हणून अनेक प्रकारचे कर आकारले जातात. मात्र, अनेकदा या करांविषयीची माहिती आणि अंमलबजावणी करण्याची क्षमता स्थानिक प्रशासनाकडे नसते. जालना शहर महानगरपालिकेच्या बाबतीतही असेच काहीसे घडत असल्याचे दिसते. वस्तू व सेवा कर कायदा, २०१७ (ऋद्ध) लागू झाल्यानंतर महाराष्ट्रातील करमणूक शुल्क कायद्यात मोठे बदल झाले. या बदलांनुसार, करमणूक शुल्काची जबाबदारी ’जिल्हाधिकारी व आयुक्त’ यांच्याकडून काढून ’स्थानिक प्राधिकरणां’कडे (महानगरपालिका, नगरपरिषद, जिल्हा परिषद, कटक मंडळे) सोपवण्यात आली. राजपत्र भाग चार, दिनांक २९ मे २०१७ रोजी हे स्पष्टपणे प्रकाशित करण्यात आले. परंतु, जालना महानगरपालिका या बदलाविषयी पूर्णपणे अनभिज्ञ आहे, ही बाब अत्यंत गंभीर आहे.

करमणूक शुल्क म्हणजे नागरिकांच्या मनोरंजनासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रमांवर आकारला जाणारा कर. यात चित्रपट, नाटक, सर्कस, तमाशा, जलसा, व्हिडीओ गेम, केबल टीव्ही आणि इतर कार्यक्रमांचा समावेश होतो. हा कर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नाचा एक महत्त्वाचा स्रोत असतो. केंद्र सरकारने जीएसटी लागू केल्याने अनेक अप्रत्यक्ष करांचे एकत्रीकरण झाले. यात मनोरंजन कराचाही समावेश होता. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नावर परिणाम होऊ नये, यासाठी हा कर राज्य सरकारने स्थानिक प्राधिकरणांकडे सोपवला. यामुळे स्थानिक प्रशासनाकडे उत्पन्नाचा एक महत्त्वाचा मार्ग उपलब्ध झाला.



एका बाजूला राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी अधिकार दिले, तर दुसऱ्या बाजूला जालना महानगरपालिका या संधीचा लाभ घेण्यासाठी उदासीन असल्याचे दिसत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून राजपत्रामध्ये झालेला हा बदल लक्षात न घेणे किंवा त्याकडे दुर्लक्ष करणे, हे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते. या दिरंगाईमुळे महानगरपालिकेला लाखो रुपयांच्या उत्पन्नावर पाणी सोडावे लागत आहे. शहरात विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम, प्रदर्शन आणि मनोरंजनाचे कार्यक्रम होत असतात. या सर्वांवर करमणूक शुल्क आकारून महानगरपालिकेला मोठा महसूल मिळू शकतो. परंतु, ही जबाबदारी स्वीकारण्यासच महानगरपालिका तयार नसल्याने किंवा त्यांना याबद्दल माहितीच नसल्याने या सर्व कार्यक्रमांवर कोणताही कर आकारला जात नाही. याबाबत जालना शहर मनपाचे कार्यालयीन अधिक्षकांनी युवा आदर्शशी बोलतांना त्यांना याबाबत काहीही माहिती नसल्याचे स्पष्ट केले आहे.

महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले तर त्याचा फायदा थेट नागरिकांना होतो. वाढलेल्या उत्पन्नातून शहराच्या विकासासाठी अधिक निधी उपलब्ध होऊ शकतो. उदा. चांगल्या रस्त्यांची निर्मिती, स्वच्छतेची व्यवस्था, पाणीपुरवठा आणि इतर पायाभूत सुविधांवर खर्च करता येतो. मात्र, जेव्हा महानगरपालिकाच उत्पन्नाच्या स्रोतांकडे दुर्लक्ष करते, तेव्हा नागरिकांचेही नुकसान होते. शहरातील अनेक प्रश्न निधीअभावी प्रलंबित राहतात. जालना महानगरपालिकेने केवळ उत्पन्नाचा एक स्रोत गमावला नाही, तर नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याची संधीही गमावली आहे. आतातरी महानगरपालिकेने या गंभीर बाबीची दखल घेऊन तातडीने करमणूक शुल्काची अंमलबजावणी सुरू करावी, अशी अपेक्षा आहे.

> राज्यातील अनेक महानगरपालिका, नगर परिषदा आणि स्थानिक संस्थांनी या अधिकाराचा वापर करून करमणूक कर लागू केला आहे.
>
> उदाहरणार्थ, मुंबई, पुणे, नागपूर यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये अनेक वर्षांपासून करमणूक शुल्क स्थानिक प्रशासनाकडून गोळा केला जात आहे.
>
> चित्रपटगृह किंवा नाट्यगृहे यांसारख्या व्यावसायिक आस्थापनांना त्यांच्या तिकिटांवर करमणूक शुल्क आकारून तो स्थानिक प्राधिकरणांकडे जमा करणे बंधनकारक आहे.
>
> तसेच, स्थानिक स्तरावर होणारे सांस्कृतिक कार्यक्रम, मेळावे किंवा जत्रा यांसारख्या कार्यक्रमांसाठी देखील परवानगी घेताना या कराचा भरणा करावा लागतो.

> महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र भाग चार-ब, दि. ०१ जुलै, २०१७ अन्वये करमणूकीवर वस्तू व सेवा कर लागू झाल्याने महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ मधील कलम ३ नुसार बसविण्यात येणारा करमणूक शुल्क भरण्यापासून महाराष्ट्र शासनाने पुढील आदेशापर्यंत किंवा १५ सप्टेंबर, २०१७ यापैकी जे अगोदर घडेल, तोपर्यंत सूट दिली होती. तद्नंतर महाराष्ट्र शासन, राजपत्र भाग चार-ब, दि. २२ नोव्हेंबर २०२३ महसूल व वन विभाग आदेश क्र. ईएनटी-२०१७/प्र.क्र.१११/टी-१, दिनांक १ जुलै, २०१७ अन्वये महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ मधील कलम ३ नुसार आकारण्यात येणाऱ्या करमणूक शुल्क भरण्यापासून दि. १५ सप्टेंबर, २०१७ पर्यंत दिलेली सूट ही दि. ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत सुरु ठेवण्यात आलेली आहे.

### युवा आदर्श
### फरिश्ते ...

अनधिकृत दालनाचे
उद्घाटन त्यांच्या हस्ते
शांत होईलं वावटळ
करता त्यांना नमस्ते
वाढे शक्ती आपसूक
बलाढ्यां जुळते नाते
डोळेझाक सर्व कृत्ये
सोयीस्कर सारे होते
झाकू टाके पापेसारी
देऊन सुरेख गुलदस्ते
इस्टेटी करू घ्याव्या
मज नावे हसते हसते
समारोहात संम्मेलीत
जनता सहजी फसते
फोटो सेशन जाहीरते
नशीब प्रसन्नते हसते
कृपा छत्रा सांभाळता
भोवताल जमले दाते
पायी दडवी छोट्यांना
असेचं बना जगत्ज्येते
शिरस्त्राण असे जोवर
सावरून घेती फरिस्ते
आपणा अडकू सुटती
अशांनाच म्हणतां नेते
खुर्चीसाठी रे सर्वस्वी
उजाळावे ते जुनेरिस्ते
लोक स्वतःच राबतीलं
बनती कंटकमुक्त रस्ते

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा**

**झाडे जगवा**

## जनता निर्धाराने निघाली... त्यांच्या हक्कासाठी सतत आवाज उठवत राहू - डॉ. काळे

### मोर्चासाठी मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांना टोलमाफीची मागणी

**मुंबई -** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज (दादा) जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली २९ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य मोर्चाच्या पार्श्वभूमीवर, खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केंद्र सरकारकडे एक महत्त्वपूर्ण मागणी केली आहे. या मोर्चात सहभागी होणाऱ्या हजारो नागरिकांना आर्थिक दिलासा मिळावा आणि टोलनाक्यांवरील गर्दी टाळता यावी, यासाठी मुंबईकडे ये-जा करणाऱ्या सर्व वाहनांना तात्पुरती टोलमाफी द्यावी, अशी मागणी त्यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना पत्र लिहून केली आहे.

डॉ. कल्याण काळे यांनी हे पत्र केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना थेट दिले असून, त्याची प्रत त्यांनी NHI नागपूर, NHI मुंबई (कोकण-भवन) आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) यांना ईमेलद्वारे पाठवली आहे.

या मोर्चासाठी जालना, छत्रपती संभाजीनगरसह राज्याच्या विविध जिल्ह्यांतून हजारो वाहने मुंबईच्या दिशेने निघणार आहेत. या प्रवासात, टोल नाक्यांवर होणाऱ्या प्रचंड गर्दीमुळे वेळ वाया जाईल, तसेच सामान्य नागरिक, शेतकरी आणि युवकांवर अनावश्यक आर्थिक भार पडेल, असे डॉ. काळे यांनी पत्रात म्हटले आहे. या नागरिकांनी ही चळवळ स्वयंस्फूर्तपणे उभी केली असल्यामुळे, त्यांच्यावर अतिरिक्त खर्चाचा भार टाळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.



डॉ. कल्याण काळे यांच्या मागणीनुसार, जर सरकारने टोलमाफीचा निर्णय घेतला, तर त्याचे अनेक फायदे होऊ शकतात यात आंदोलनासाठी येणाऱ्या नागरिकांची टोलवरील हजारो रुपयांची बचत होऊन आर्थिक दिलासा मिळेल.

टोल नाक्यांवर मोठी गर्दी टाळता येईल, ज्यामुळे वाहतूक कोंडी होणार नाही आणि प्रवासाचा वेळ वाचेल.

हा निर्णय सरकार आंदोलनाशी आणि त्यात सहभागी होणाऱ्या नागरिकांशी संवेदनशील आहे, हे दर्शवेल.

या संदर्भात बोलताना डॉ. कल्याण काळे म्हणाले, जनता निर्धाराने निघाली आहे. आम्ही तिच्या हक्कासाठी सतत आवाज उठवत राहू! ही मागणी फक्त एका राजकीय भूमिकेपुरती मर्यादित नसून, जनतेच्या प्रश्नांसाठी शासन आणि प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याची लोकप्रतिनिधी म्हणून असलेली जबाबदारी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

या मागणीवर सरकार काय निर्णय घेते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. जर हा निर्णय मान्य झाला, तर आंदोलकांना मोठा दिलासा मिळेल आणि वाहतुकीचे व्यवस्थापन अधिक सुलभ होईल.

### बळीराजाच्या सखा सोबतीचा सण

## आमदार बबनराव लोणीकर यांनी बैलांची केली ‘खांदेमळण’



**लोणी खुर्द । प्रतिनिधी -** बळीराजाचा अत्यंत महत्त्वाचा सण असलेल्या पोळ्याच्या पार्श्वभूमीवर, माजीमंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या मूळगावी लोणी खुर्द येथे बैलांची ’खांदेमळण’ करून त्यांना खास निमंत्रण दिले. आज आवतन, उद्या जेवायला या... असे आत्मीयतेने म्हणत त्यांनी बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. पोळा सणापूर्वी बैलांचे खांदे मळण्याची परंपरा शेतकरी कुटुंबात पाळली जाते. यावेळी आमदार लोणीकर यांनी स्वतः आपल्या बैलांची पूजा करून या परंपरेचे पालन केले.

पोळा सणाच्या आदल्या दिवशी म्हणजेच खांदेमळण दिवशी बैलांना गरम पाण्याने आंघोळ घातली जाते. त्यानंतर त्यांच्या खांद्यांना हळद आणि तेल लावून मळले जाते, जेणेकरून वर्षभर शेतीकामामुळे झालेल्या वेदना कमी होतील. या दिवशी शेतकरी आपल्या बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य देतात आणि त्यांची सेवा करतात. ही परंपरा बैलांप्रती शेतकऱ्याचे प्रेम, आदर आणि कृतज्ञता दर्शवते. आमदार लोणीकर यांनी याच परंपरेचे पालन करत बैलांना सन्मान दिला.

यावेळी सुनीलबापू लोणीकर, गजानन लोणीकर, सहदेव मोरे, राम कव्हळे, रवि उफाड, महादेव कानपुडे यांच्यासह अनेक ग्रामस्थ आणि कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी सर्वांनीच या परंपरेचे कौतुक केले आणि पोळा सण साजरा करण्याची तयारी केली. ही कृती ग्रामीण संस्कृती आणि शेतीनिष्ठ जीवनशैलीची आठवण करून देते.

## अंबडमध्ये ‘पोलिसगिरी’चा नवा अध्याय!

### खऱ्या चोरांनी निवृत्त मुख्याध्यापकाला शिकवली फसवणुकीची ‘कला’

**दीपक शेळके**

**जालना -** अंबड शहरात सध्या 'पोलिसगिरी'चा एक नवा अध्याय सुरू झाला आहे. येथील ‘खाकी वर्दी’तील दोन भामट्यांनी एका निवृत्त मुख्याध्यापकालाच दिवसाढवळ्या लुटून पोलिसांच्या ‘सन्मानात’ भर घातली आहे. आतापर्यंत आपण खऱ्या चोरांकडून चोरी झाल्याचे ऐकले होते, पण इथे तर चोरांनीच पोलिसांची भूमिका घेऊन चोरी केली.

**चोरांचे ‘ॲक्टिंग’ पाहून पोलीसही लाजले असतील**

निवृत्त मुख्याध्यापक उत्तमराव विठ्ठलराव शिंदे (वय ७२) हे शांतपणे घरी जात होते. त्यांना काय माहीत, की त्यांची गाठ थेट दोन ‘हॉलिवूड’ दर्जाच्या कलाकारांशी पडणार आहे. मोटारसायकलवरून आलेल्या या 'कलाकारांनी' मोठ्या आत्मविश्वासाने सांगितले, आम्ही पोलीस आहोत. आणि त्यांच्या ‘ॲक्टिंग’वर विश्वास ठेवून शिंदे यांनीही त्यांचे म्हणणे ऐकले. या तोतया पोलिसांनी मोठ्या चालाखीने शिंदे यांच्याकडील दागिने रुमालात बांधायला लावले आणि जादू केल्याप्रमाणे ते गायब केले. 'जादूचा रुमाल' घेऊन गेलेल्या या कलाकारांचा 'परफॉर्मन्स' इतका जबरदस्त होता, की खऱ्या पोलिसांनाही लाज वाटली असेल.

**‘नव्या’ पोलीस अधिकाऱ्यांना सलाम**

एकूणच, ही घटना पाहून असे वाटते की आपल्या चोरांनीही आता 'प्रोफेशनल' होण्याची तयारी केली आहे. सोन्याच्या दागिन्यांसाठी त्यांनी साधासुधा चोर न बनता थेट ‘पोलीस’ बनण्याचा निर्णय घेतला. २ लाख २५ हजार रुपयांचे दागिने लंपास करून या ‘पोलीस’ अधिकाऱ्यांनी एक नवा विक्रमच प्रस्थापित केला आहे.

या घटनेमुळे अंबड शहरात एक गंभीर प्रश्न उभा राहिला आहे: जेव्हा पोलिसच तोतया बनून लोकांना लुटतात, तेव्हा सामान्य नागरिकांनी कोणावर विश्वास ठेवायचा? पोलिसांनाच ‘चोर पकडा’ असे सांगण्याऐवजी आता ‘चोरांपासून पोलीस बनायची कला शिका’ असे सांगावे लागेल. या ‘नव्या’ पोलीस अधिकाऱ्यांचा शोध घेऊन त्यांना लवकरच ‘गुन्हेगार’ म्हणून अटक करावी, हीच अपेक्षा.



# संपादकीय

## नाही तर नैसर्गिक आपत्तीचे बळी बना

मुसळधार पावसाने मुंबईसह नवीमुंबई, ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यात हाहाकार उडवला. मुंबई उपनगरात २४ तासात २३८.२ मिलिमीटर पाऊस झाला तर ठाणे शहरात १३३ मिलिमीटर पाऊस पडला. मुंबई शहरातही ११० मिलिमीटर इतका पाऊस झाला. कोकणातही पावसाने अशीच तडाखेबंद हजेरी लावली. केवळ मुंबई, ठाणे आणि कोकणच नव्हे तर संपूर्ण राज्यात पावसाने दाणादाण उडवली. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडला. नाशिकमध्येही पावसाने कहर केला. विदर्भात नागपूर, अमरावती, यवतमाळ, वर्धा, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांना पावसाने तडाखा दिला तीच परिस्थिती मराठवाड्यातही झाली एकूणच पावसाने सपूर्ण राज्यात कहर केला. गेल्या काही दिवसांपासून दडी मारून बसलेल्या पावसाने असे रौद्ररूप धारण केले की सर्वांचीच पाचावर धारण बसली. या पावसाने मोठ्या प्रमाणात वित्तहानी तर झालीच पण काही ठिकाणी जीवितहानी देखील झाली. काहींना आपला जीव देखील गमवावा लागला. नद्या, नाल्यांना पूर आला. अनेकांचा संसार पाण्यात बुडाला, शेतीवाडी पाण्याखाली गेल्याने हातातोंडाशी आलेला घास हिरावून गेल्याने बळीराजा हताश झाला. क्षणात होत्याचे नव्हते झाले. देशाची आर्थिक राजधानी असलेली आणि कधीही न थांबणारी मुंबईही या पावसाने काही काळ ठप्प झाली. या पावसाने मुंबईची पुन्हा एकदा तुंबई झाली. जोरदार पावसाने मुंबईचे जनजीवन विस्कळीत झाले. शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली. पावसामुळे शासकीय आणि अशासकीय कर्मचाऱ्यांना देखील शासनाने सुट्टी दिली. जागोजागी पाणी तुंबल्याने रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचले. लोकांच्या घरात पाणी आले. त्यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले. रस्त्यांवर पाणी आल्याने रस्ते वाहतूक खोळंबली त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. शेकडो गाड्या जाग्यावरच थांबल्या त्यामुळे महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली. काही ठिकाणी दरड कोसळल्याने महामार्ग बंद झाले. रेल्वे मार्गावर पाणी साचून रुळ पाण्याखाली गेल्याने लांब पल्ल्याच्या अनेक गाड्या रद्द कराव्या लागल्या. लांब पल्ल्याच्या गाड्याच नाही तर अनेक लोकलही रद्द कराव्या लागल्या. काही मार्गावर धीम्या गतीने लोकल सोडाव्या लागल्या. पावसाचे पाणी रेल्वे स्थानकावरून धबधब्याप्रमाणे ओसंडून वाहत होते. पावसामुळे रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले. पावसामुळे तांत्रिक बिघाड झाल्याने मोनोरेल जाग्यावरच थांबली. त्यात शेकडो प्रवासी अडकले. आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशामक जवानांच्या पथकाने आपली जबाबदारी चोख पार पडल्याने प्रवाशांची सुरक्षित सुटका झाली. केवळ नशीब बलवत्तर होते म्हणूनच प्रवाशांचा जीव वाचला. या पावसाने २६ जुलै २००५ ला मुंबईत झालेल्या पावसाची आठवण करून दिली. त्यावेळी झालेल्या पावसात देखील मुंबईची अशीच अवस्था झाली होती. २६ जुलैच्या पावसानंतर आपण कोणताही धडा घेतला नाही म्हणूनच ही वेळ पुन्हा आली. २६ जुलैला निसर्गाने शहरांचे योग्य नियोजन करा नाहीतर नैसर्गिक आपत्तीचे बळी बना असा इशारा देऊन धडा शिकवला होता तरीही त्यातून आपण काहीही शिकलो नसल्याने दरवर्षी ये रे माझ्या मागल्या असेच चालू आहे. शहरीकरण करताना नागरी नियोजनाची आखणी न केल्याने शहरांच्या सीमा वाढत गेल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. नियोजनाचा आराखडा तयार न करता कागदावरील नकाशाच्या सीमा वाढवून महानगराची मांडणी करणारे शासन आणि प्रशासन याला जबाबदार आहे. मुबई पुण्यासारख्या मोठ्या शहरांच्या सीमा विस्तारित चालल्या आहेत. या शहरात दरवर्षी नव्या गावांची भर पडत आहे. नगर नियोजनाकडे गांभीर्याने न पाहता नागरीकरणाचा निर्णय घेतल्याने ही पूरस्थिती निर्माण झाली. शहरांच्या विस्तारण्याच्या शहरीकरणात पर्जन्यवाहिन्या, मलनिस्सारन अशा विविध विभागांचे एकत्रीकरण करून नियोजनाची मांडणी करण्याची प्राथमिकताही पूर्ण केली जाते का असाही प्रश्न निर्माण होतो. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद आणि एमएमआरडीए यांचा एकत्र मेळ बसत नसल्याने शहरांचे नियोजन कोलमडत आहे. उघडी गटारी, तुंबलेले नाले, अनधिकृत बांधकामे, अरुंद रस्ते, वाढती लोकसंख्या, सिमेंटची वाढती जंगले, सिमेंटची रस्ते, जागोजागी बसवलेली पेव्हिंग ब्लॉक्स या सर्वांचा एकत्रित परिपाक म्हणजे ही पूरस्थिती. सरकारने आतातरी जागे होऊन शहर नियोजनाचा योग्य निर्णय घ्यावा अन्यथा भविष्यात यापेक्षाही भीषण परिस्थितीला सामोरे जागे लागेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# रोगराई, महागाई व भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन जा गे मारबत!

मारबत उत्सव ही नागपूरच्या इतिहासातील मोठी आणि ऐतिहासिक परंपरा आहे.मारबत उत्सवाची सुरूवात इंग्रजांच्या काळात सुरू करण्यात आली.यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना एकत्रित करून इंग्रजांविरूध्द मोठा लढा उभा करणे. कालांतराने हा उत्सव समाजातील वाईट चालीरितीचा व वाईट रूढींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे या सणाचे उद्दीष्ट ठरले.येणारे विघ्न दुर करण्यासाठी १८८० मध्ये काळ्या मारबतीची सुरूवात झाली.यानंतर १८८४मध्ये पिवळ्या मारबतीची सुरूवात झाली.आज काळ्या मारबतीला १४५ वर्षे पूर्ण होत आहे तर पिवळ्या मारबतीला १४०वर्षे पूर्ण होत आहे हा एक इतिहासच म्हणावा लागेल. दोन्ही मारबती मांडण्या मागचा एकच उद्देश होता आणि आहे तो म्हणजे येणारे विघ्न, रोगराई, महागाई, दुष्काळ, भ्रष्टाचार दूर व्हावा.नागपूरसाठी आश्चर्याची गोष्ट म्हणजे आजही १४५ वर्षे जुनी परंपरा त्याच पद्धतीने पारपाडल्या जाते. हा नागपूरच्या इतिहासातीलच नाही तर भारतीय इतिहासातील परंपरेची मोठी धरोहर व संस्कृतीच म्हणावी लागेल. कारण या उत्सवात संपूर्ण धर्माचे लोक मोठ्या आनंदाने सहभागी होतात.त्यामुळे ही नागपुरकरांसाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे.त्याहीवेळेस मारबतीची सलग आठ दिवस पुजा-अर्चना व्हायची आणि आताही होते.त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक कार्यक्रम सुध्दा होतात. असेही सांगण्यात येते की मारबत ही नवसाला पावणारी असल्याची अनेकांची श्रद्धा आहे. मारबतीच्या दर्शनासाठी अनेकजन नवजात शिशूचे तोंड मारबतीच्या स्तनाला लावण्याची देखील प्रथा आहे.त्यामुळे काळ्या



मारबतीचा व पिवळ्या मारबतीला पारंपरिक पद्धतीने महत्त्व दील्या जाते.मारबतीचा सन पोळ्याच्या पाडव्याला म्हणजे तान्हया पोळ्याच्या दिवशी भव्य मिरवणूक काढुन येणाऱ्या विघ्नांच्या व विघटनकारी शक्तीच्या विरोधात जय घोष करून ईडा-पीडा,माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत अशा घोषणांनी केल्या जाते व संपूर्ण शहरातील नागरिक यात सहभागी होवून संपूर्ण नागपूर दुमदुमते.मोठ्या पोळ्याच्या दिवशी म्हणजेच अमावस्येला घरोघरी मेड्यांच्या (पळसाचे) फांद्यांची पुजा केली जाते व दुसऱ्या दिवशी पाडव्याला चौका-चौकामध्ये पळसाच्या फांद्यांचे दहन केले जाते व घोषणा केली जाते माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबतअशा घोषणा केल्या जातात.माझ्यामते सायंटिफिक दृष्ट्या किंवा सामाजिक दृष्ट्या पळसाच्या पानांच्या धुर अवश्य जंतुनाशकाचे कार्य करीत असावे यात दुमत नाही. कालांतराने या दिवसाला एवढे महत्त्व आले की भ्रष्ट व कलंकित राजनेता किंवा भ्रष्टाचारी यांच्या विरोधात त्याची प्रतीकृती काढून बडगा काढून निषेध केला जातो.त्याच प्रमाणे महागाई,अत्याचार, आतंकवाद, महामारी, बँक घोटाळे इत्यादींच्या विरोधात बडग्याच्या रूपात प्रतीकृती काढून निषेध नोंदविला जातो.यात अनेक सामाजिक संघटना (मंडळ) मोठ्या प्रमाणात सहभागी होतात.पिवळ्या व काळ्या मारबतीच्या रूपाने आज अनेक विघटनकारी शक्तीचा, अत्याचाराचा विरोध करून समाजात जनजागृती करण्याची काळ्या व पिवळ्या मारबतीपासुनच परंपरा मिळाली आहे असे मी समजतो.कारण यामुळे समाजात राजकीय पुढारी, अत्याचारी, भ्रष्टाचारी कोणते घृणास्पद कार्य करतात हे संपूर्ण उघडपणे बडग्याच्या रूपात आपल्याला व देशाला पहायला मिळते व यामुळे समाजात जनजागृती निर्माण होत असते. म्हणजेच मारबत हा सन समाज जागृतीचा मोठा दिवस असल्याचे मी समजतो.कारण यामुळे राजकीय पुढाऱ्यांची मोठ्या प्रमाणात पोल-खोल होत असते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे १८९७ मध्ये प्लेगची साथ आली होती.त्यानंतर १९२८मध्ये नागपूरात इंग्रजांनी हिंदू-मुस्लिम दंगली घडविल्या तरीही संपूर्ण धर्माच्या समाजबंधवांनी मारबत उत्सवाला कुठेही तडा जाऊ दिली नाही ही नागपूरसाठी स्वाभिमानाची बाब आहे.त्यामुळे या दोन्ही वर्षी मारबत उत्सवात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण झाला नाही.परंतु करोना महामारीच्या काळात पहिल्यांदाच मारबत उत्सवातील मिरवणुकीत विघ्न निर्माण केले.परंतु करोना महामारी संपुष्टात आल्यानंतर देशातील संपूर्ण धर्माचे सण मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरे व्हायला लागले.मुख्यत्वे करून समाजातील वाईट गोष्टींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे मारबत उत्सव या सणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. मारबत उत्सवात बडग्यांची भुमिका मोलाची असते कारण बडगे हे देशातील विघातक गोष्टींचा निषेध नोंदविनारे असतात. यावर्षी मिरवणुकीत आपल्याला अनेक बडगे पहायला मिळेल यात महागाई, सिलेंडरची दरवाढ,पेट्रोल दरवाढ, शहरातील खड्डे, पाकिस्तान, चीन, आतंवाद, घोटाळेबाज, भ्रष्टाचारी, अत्याचारी, बेरोजगारी इत्यादी घटनेच्या विरोधात शंभरहून अधिक बडगे यावर्षी आपल्याला पहायला मिळु शकते.मारबत उत्सवाची सुरूवात नागपूर मधुन झाली.परंतु आता मारबत उत्सव महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात साजरा केल्या जातो. आज मारबत उत्सवाच्या निमित्ताने देशात होणारे अत्याचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, महागाई,वाढता भ्रष्टाचार यांचा विरोधात समाजाने एकत्रित येण्याच्या उद्देशाने देशातील अनेक राज्यांनी नागपुरची परंपरा अंगीकारून समाजात सर्वसामान्यांवर होणारा अत्याचार देशातील१४० कोटी जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहावा या उद्देशाने मारबत उत्सवाच्या दिवशी प्रतिकात्मक पुतळ्याचे बडगे काढून विरोध प्रगट केल्या जातो.यामुळे सुध्दा समाजात जनजागृती होतांना आपण पहातो.देशातील भ्रष्टाचाऱ्यांनी देशाला इतके पोखरून टाकले आहे की इंग्रजांनी देशाला लुटले खरे,परंतु



देशातील भ्रष्ट नेत्यांनी देशाला हजार पटीने लुटले आहे.यांच्यामुळे देशात महागाईचा, बेरोजगारीचा व शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा डोंगर उभा झाला आहे.याचे प्रायश्चित्त देशातील १४० कोटी जनता भोगत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे व गरीबांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे. त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांना सर्वप्रथम घेऊन जा गे मारबत!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा दिवस; बैलपोळा

आपला देश हा कृषिप्रधान असून त्यात शेतकरी हा महत्त्वाचा घटक आहे आणि शेतकऱ्याचा लाडका मित्र सखा म्हणजे बैल ज्याच्यामुळे शेतातील पीक पिकवायला आपल्या बळीराजाला खूप मोठी मदत होत असते. आणि त्यामुळेच महाराष्ट्रात बैला प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बैलपोळा हा सण साजरा केला जातो.

श्रावण महिना आता संपत आलाकी येतो शेवटचा सण म्हणजे बैलपोळा.

श्रावण महिन्यात सणांची रेलचेल पहायला मिळते. अनेक सण या महिन्यात आपल्याला भेटीला येतात. पावसाचे दिवस असल्याने सृष्टी आधीच हिरवाईचा शालु नेसुन नवीकोरी झालेली असते. संपुर्ण वातावरणात एक गारवा पसरल्याने मानवी मन देखील ताजं तवानं झालेलं असतं.

अश्या या श्रावण महिन्यात आपण नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी यांसारखे सण साजरे करतो आणि या श्रावण महिन्याची सांगता होते ती श्रावण महिन्याच्या अखेरीस येणाऱ्या बैलपोळा या सणाने.बळीराजाचा आनंदाचा दिवस.

श्रावण अमावस्येला अर्थात पिठोरी अमावस्येला शेतकरी बांधव आपल्या सर्जाराजाचा हा सण अत्यंत आनंदाने आणि उत्साहाने साजरा करतांना आपल्याला दिसतात.विदर्भ, खान्देशात,हा सण मोठ्या उत्साहाने साजरा करतात.

आपला देश कृषी प्रधान देश आहे त्यामुळे शेती शेतकरी यांना जसे महत्त्व आहे तसेच आपल्या शेतात ज्याच्या सहाय्याने आपण शेतीची मशागत करतो त्या बैलाचे विषयी कृतज्ञता व्यक्त करत असतो आणि तो कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे बैलपोळा.

पुणे मुंबई यांसारखी मोठी शहरं या सणाविषयी कदाचीत अनभिज्ञ असावीत. शहरी जीवनातील व्यस्तता एवढी वाढली आहेत या शहरांची धावपळ पाहिली की पोळा या सणाची यांना काही माहिती आहे की नाही असे वाटते.सणाची काहीही गडबड नसते. तरी पण बऱ्याच भागात पोळ्याच्या आधीच बाजारात निरनिराळ्या प्रकारच्या बैलांची जोडी, माती पासून,

सुंदर प्रकारे रंगवलेले,आकर्षक बैल बाजारात विक्रीला असतात. ज्यांच्याकडे शेती नाही ते सुद्धा अशी बैल जोडी पोळ्याच्या दिवशी आणून त्यांची पूजा करतात आणि पुरणपोळीचा नैवेद्यही दाखवतात. शहराच्या आसपासची गावं आणि संपुर्ण महाराष्ट्रात बळीराजा आपल्या जिवाभावाच्या सोबत्याचा हा सण अत्यंत पारंपारीक पध्दतीने आजही साजरा करतांना दिसतो. आपल्या महाराष्ट्रात विदर्भ, खानदेश,आणि ईतर काही भागात बैलपोळा मोठ्या उत्साहात साजरा होतो. हा आपल्या मातीशी जोडणारा सण आहे.ही संस्कृती आपणच जपायला हवी.

आमचे लहानपणी घरी दोन दोन बैलजोड्या होत्या. काका,वडिल,बैलाना आमंत्रण द्यायचे.

पोळा या सणाच्या आदल्या दिवशी बैलांना रितसर आमंत्रण



देण्याची पध्दत आहे .त्याला खांदे मळणी म्हणतात.

आज आमंत्रण देतोय ते स्विकारा आणि उद्या जेवायला या! अस कानात सांगतात.असं मानाने आमंत्रण या बैलांना दिलं जातं.

दुसऱ्या दिवशी सकाळी बैलांना नदीवर न्यायचं, त्यांना झकास अंघोळ घालायची. घरी आणल्यावर त्यांच्या सर्वांगावर गेरूने ठिपके द्यायचे, शिंगाना बेगड,रंग, डोक्याला बाशिंग, गळयात कवडया आणि घुंगरांच्या माळा घातल्या जातात. पायांमधे चांदीचे किंवा करदोडयाचे तोडे घालतात. नवी वेसण नवा कासरा घातल्यानंतर अंगावर रेशमी नक्षीकाम केलेली झुल पांघरली जाते. बैलांचा गोठा स्वच्छ करण्यात येतो. घरातील सुवासीनी बैलांची विधीवत पुजा करतात.

बैलांना पोळयाच्या दिवशी कोणतेही काम करू दिले जात नाही.दिवस त्यांचे सेवेत घालवायचा. गोडाधोडाचा पुरणपोळीचा घास त्याला नैवेद्य दाखविला जातो. बैलाची कायम निगा राखणाऱ्या सालदाराला नवे कपडे दिले जातात.जेवण दिल जात.मालक सालदार बरोबरच जेवतात.भेद नसतो. सालदाराला प्रथेनुसार नविन कपडे, दिले जातात.

बैलांचे जेवण झाल्यानंतर सायंकाळी त्यांना गावाबाहेर मंदिरात नेले जाते. सवाद्य मिरवणूक काढून गावात नदीच्या काठावर बैलाना आणले जाते.

सर्व शेतकरी आपापल्या जोड्या घेउन या ठिकाणी एकत्र येतात. आंब्याच्या पानांचे तोरण बांधुन बैलांना रांगेत उभे करण्यात येते. ढोल ताशे नगारे वाजवले जातात. गावचा पोलिस पाटील तोरण तोडतील आणि पोळा फुटतो. पोळयाची गितं म्हंटली जातात. येथे बैलांच्या शर्यती देखील आयोजित केल्या जातात. ज्याच्या जोडीला सर्वात चांगले तयार केले असेल त्या जोडीला पारितोषीक दिले जाते. आपापल्या गावातील परंपरेनुसार उत्सव साजरा झाल्यानंतर कार्यक्रम संपन्न होतो. घरी निघतांना बैलांना घरोघरी नेले जाते तेथे घरोघरि बैलांची पुजा करतात .औक्षण करतात. पुरणपोळीचा घास भरवतात. बैल घरोघरी नेणाऱ्यास ओवाळणी (पैसे) देतात.त्याला बोजारा म्हणतात.

हिंदु संस्कृतीत वृक्षांप्रमाणेच वन्यजिवांना देखील पुजनीय मानले जातं. वर्षभर शेतात शेतकऱ्या समवेत बरोबरीने राबणाऱ्या बैलाप्रती एक दिवस उतराई होण्याची संधी म्हणुन पोळा या सणाकडे आपण पाहातो.



पुर्वापार चालत आलेल्या रूढी परंपरांप्रमाणे हे उत्सव आजही गावागावांमधुन साजरे होतांना आपल्याला दिसतायेत. पण पहिल्या सारखा उत्साह वाटत नाही.त्याला अनेक कारणे आहेत.

बहुतेक कामे मशिन,ट्रॅक्ररच्या साह्याने होत असल्याने बैलांची संख्या ही रोडावली आहे.शहरी भागात तर पोळा सण आला गेला अशीच अवस्था असते.

अजूनही बऱ्याच घरात मातीची बैलजोडी आणून पूजा करतात.

मराठी पंचांगानुसार श्रावण अमावस्या तिथी २२ ऑगस्ट २०२५ सकाळी ११.५५ वाजेपासून २३ ऑगस्ट २०२५ ला सकाळी ११.३४ वाजेपर्यंत असणार आहे. उदय तिथीनुसार २३ ऑगस्ट २०२५ अमावस्या असणार आहे आणि त्यादिवशी बैल पोळा साजरा करण्यात येणार आहे.

जोपर्यंत शेती-शेतकरी,शेती संस्कृती आहे,तोपर्यंत पोळा आणी बैलपोळ्याच महत्व टिकून रहाणार आहे.ते जिवाभावाचे नाते आहे.हे सांगायला नको.

बहिणाबाई चौधरी आपल्या कवितेत म्हणतात -

आला आला शेतकऱ्या, पोयाचा रे सन मोठा,
हाती घेईसन वाट्या,आता शेंदूराले घोटा,
आता बांधा रे तोरनं
सजवारे घर दार..।

बैलपोळ्याच्या सर्व शेतकरी बांधवांना शुभेच्छा.!

**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगांव.**
**मो.८९९९५६६९१७**
dilipdeshpande24gmail.com

# पोळा; शेतकऱ्यांना उत्साहीत करणारा उत्सव

पोळा हा बैलांचा उत्सव. शेतकऱ्यांना उत्साहीत करणारा असा हा उत्सव आहे. अनंत कष्ट करून अन्नधान्याचे उत्पादन करणार्या शेतकर्याला आनंदी पहाणे कोणाला आवडणार नाही.

तिथी- पोळा हा उत्सव प्रदेशानुसार आषाढ, श्रावण वा भाद्रपद मासात साजरा केला जातो. महाराष्ट्रात हा उत्सव श्रावण मासातील अमावास्येला साजरा केला जातो.

उद्देश- या उत्सवाद्वारे बैलांविषयी एकप्रकारे कृतज्ञता व्यक्त केली जाते., हा उत्सव साजरा केल्याने शेतात भरपूर धान्य पिकते आणि गोधन वाढते, असे समजले जाते., ‘पोळ्याच्या दिवशी जे प्राणीमात्र आपल्या कष्टाने मानवाच्या



जीवनाला आधारभूत झालेले आहेत, त्यांची पूजा आणि स्मरण केले जाते.

उत्सव साजरा करण्याची पद्धत- शेतकऱ्यांमध्ये या उत्सवाला फार महत्त्व आहे. पेरण्या झाल्यानंतर शेतीच्या कामांतून बैल रिकामे झाले म्हणजे त्यांना न्हाऊ-माखू घालायचे, आरती ओवाळायची, नैवेद्य दाखवायचा आणि मग दुपारी रंगवून आणि शृंगारून गावातून मिरवत न्यायचे, असा हा उत्सव सोहळा असतो.

**संदर्भ : सनातन-निर्मित ग्रंथ ‘सण, धार्मिक उत्सव आणि व्रते’**

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था संपर्क- ९२८४०२७१८०**

# विक्रमी नफ्यासह विविध लोकप्रिय योजनांमुळे जाफराबाद शिक्षक पतसंस्था कौतुकास पात्र - जिनेन्द्र काळे

## जाफराबाद शिक्षक पतसंस्थेची वार्षिक सभा उत्साहात संपन्न

**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** जाफराबाद जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्थेच्या संचालक मंडळाने वसुलीसाठी केलेले भरीव प्रयत्न,त्याबरोबरच विविध सभासद उपयोगी योजना यामुळे जाफराबाद जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्था कौतुकास पात्र ठरली असल्याचे प्रतिपादन जाफराबाद पंचायत समितीचे ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी जिनेन्द्र काळे यांनी सोमवारी ता. १८ केले. जाफराबाद जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्थेच्या ४५ व्या वार्षिक सभेत अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते. यावेळी प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष भगवान भालके, माजी चेअरमन भगवान दळवी, पाराशर शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन संतोष इंगळे, राजर्षी शाहू शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन प्राध्यापक ज्ञानेश्वर निकम, केंद्रप्रमुख गजानन मांटे ,डि. के. खरात, सुधाकर चिंधोटे, अंकुश इंगळे, सुनील भोंडे, विजय चित्ते, मनोहर चित्ते, शरद निश्चल, मंगलसिंग धन्नावत, रिजवान शेख, प्रदिप साळोख, नरेंद्र पुजारी, दिलीप आढे, भगवान शेळके, चेअरमन गणेश पवार माजी चेअरमन विनोद कळंबे, व्हाईस चेअरमन प्रदीप ताठे, माजी सचिव वसंता शेवाळे,मानद सचिव संजय लोखंडे, संचालक दीपक चव्हाण अभिजीत साळवे संजय निकम, किरण तिडके, गणेश फुकट, सुनिता खलसे, बद्रीनाथ जायभाये, संजय गवते, उमेश दुनगहू,बळीराम उबरहंडे ,नारायण मेरत,कैलास बकाल, निंबाजी कड, अनिल भोसले, विजय वैद्य, गजानन चाटे,अलजिलानी सर, कैलास चेके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना श्री काळे म्हणाले की पतसंस्थेच्या संचालक मंडळांनी केलेल्या पारदर्शक कारभारामुळे आज रोजी पतसंस्था एक कोटी रुपयांच्या नफ्यात असून येणारा काळ या पतसंस्थेसाठी दैदिप्यमान असल्याचे ते म्हणाले. यावेळी पतसंस्थेच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या सेवानिवृत्त सभासद सन्मान योजनेचा लोकार्पण सोहळा पार पडला. पतसंस्थेच्या सेवानिवृत्त सभासदांना यापुढे २५०० रुपयांचा धनादेश देण्यात येणार आहे. याशिवाय पतसंस्थेमध्ये पाच लक्ष रुपये ठेवणाऱ्या सभासदांना पाच ग्रॅम चांदीच्या नाण्याची वितरण करण्यात आले. याबरोबरच आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक प्रतिभा राजपूत,दिलीप ढाकरे, श्रीकिशन शिल्लरकर, प्रल्हाद काळे, दिपक खरात, बी. डी. वाघ, विलास जाधव, सिद्धेश्वर लंगोटे, नवनाथ शिंदे, गणेश जाधव, गजानन घोडके, धनंजय मुळे, दिलीप म्हस्के, सुखदेव वर्गने, कैलास जाधव, यांच्यासह शिक्षकांचे उच्च शिक्षणास पात्र ठरलेले गुणवंत पाल्य, सेवानिवृत्त सभासद यांचा देखील सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चेअरमन गणेश पवार यांनी केले. यावेळी भगवान दळवी, नरेंद्र पुजारी, भगवान भालके यांची समायोजित भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक चव्हाण यांनी तर आभार विजय वैद्य यांनी मानले. वार्षिक सभेच्या द्वितीय सत्रामध्ये विविध विषयावर चर्चा करण्यात आली यावेळी उपस्थित असलेल्या सभासदांना चेअरमन गणेश पवार यांच्यासह उपस्थित सर्व संचालक मंडळाने समर्पक उत्तरे दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पतसंस्थेचे सचिव श्रीराम देठे,प्रवीण अंभोरे, रमेश सुसर यांच्यासह सभासदांनी परिश्रम घेतले.



मंठा तालुक्यातील कोकरसा येथे शिवसेनाचा मेळावा

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत विरोधकांना जागा दाखवणार - घोसाळकर



**मंठा । प्रतिनिधी -** हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये विरोधकांना चोख प्रत्युत्तर देण्यासाठी सज्ज झाली आहे. मंठा तालुक्यातील कोकरसा येथे आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात पक्षाचे संपर्कप्रमुख आणि माजी आमदार विनोद घोसाळकर यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना, आगामी निवडणुकांमध्ये विरोधकांना त्यांची जागा दाखवण्याची वेळ आता आली आहे असे ठाम वक्तव्य केले.

या मेळाव्यास शिवसेना उपनेते लक्ष्मण वडले, जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर, माजी आमदार संतोष सांबरे, जिल्हाप्रमुख महेश नळगे, उपजिल्हाप्रमुख माधवराव कदम, तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे, युवासेना जिल्हाप्रमुख गणेशराव काळे, उपजिल्हाप्रमुख अशोकराव आघाव तसेच शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मेळाव्यात बोलताना विनोद घोसाळकर म्हणाले, स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी कठीण परिस्थितीत शिवसेनेची स्थापना केली आणि महाराष्ट्रात पक्षाचे विचार रुजवले. आज उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आणि युवा नेते आदित्य ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष नव्या उमेदीने पुढे जात आहे. गद्दार कितीही गेले तरी बाळासाहेबांचे विचार आजही संपलेले नाहीत. आगामी निवडणुकांमध्ये आपण हे सिद्ध करणार आहोत. त्यांनी पुढे श्री बजरंगबलीच्या गीतातील ओवीही उद्धृत करत कार्यकर्त्यांच्या उत्साहात भर घातली - आले किती गेले किती, संपले भराया; तरी तुझ्या नामाचा अजुनी दरारा.

शिवसेना उपनेते लक्ष्मण वडले यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना म्हटले, कार्यकर्ता हा पक्षाचा आत्मा आहे. युवकांना आता मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होत आहे. गावोगावी 'गाव तिथे शाखा' अभियान राबवून पक्षाचे विचार घराघरात पोहोचविण्याचे काम प्रत्येक शिवसैनिकाने हाती घ्यावे.

या मेळाव्यात तालुक्यातील दहा तांडा आणि कोकरसा परिसरात नव्या शिवसेना शाखांची स्थापना करण्यात आली. जिल्हाप्रमुख महेश नळगे आणि तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून अनेक कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला.

या प्रवेश सोहळ्यात देवगाव खवणे सरपंच डॉ. संदीप मोरे, सिद्धेश्वर काकडे (जयपूर), ज्ञानेश्वर काकडे (ग्रां.पं.), जीवन चिंतामणी, महादेव खवणे, बबनराव साळवे, संतोष खवणे, प्रकाश दाहिजे, योगेश लोमटे, मारुती लोमटे, बाबासाहेब लोमटे, अमोल लोमटे, राजेश लोमटे, विजय लोमटे, सोमनाथ घुगे, भगवानराव देशमुख, आयुब सय्यद यांसह शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

मेळाव्याला विभाग प्रमुख शिवाजीराव मोरे, विजयराव दवणे, श्रीकृष्ण पवार, सचिन चव्हाण, इम्रान पठाण, निलेश बोराडे, अशोक खंदारे, बाळासाहेब वैद्य, विजय दवणे, नवनाथ नाईक, रितिक जाधव यांसह परिसरातील हजारो कार्यकर्त्यांनी हजेरी लावली.

या मेळाव्यातील जोशपूर्ण वातावरणामुळे तालुक्यातील आगामी निवडणुकांचे समीकरण बदलणार असल्याचे संकेत स्पष्ट दिसत होते. विशेष म्हणजे युवक व नव्या कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग पाहून जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये शिवसेना (उद्धव ठाकरे) गट आपली ताकद दाखवणार हे निश्चित झाल्याचे राजकीय वर्तुळात चर्चिले जात आहे.

# सार्वजनिक बांधकाम विभागाची कामात दिरंगाई

## १६ महिन्यांपासून ११.५ कोटींचा रस्ता सुरूच नाही

**परतूर । प्रतिनिधी -** शेगाव-पंढरपूर दिंडी मार्गाला जोडणाऱ्या संकनपुरी-सावरगाव बुद्रुक रस्त्याचे काम कार्यारंभ आदेश (Work Order) मिळाल्यानंतरही १६ महिने उलटले तरी सुरू झालेले नाही. या दिरंगाईमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप असून, त्यांनी थेट राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे तक्रार केली आहे. संबंधित कंत्राटदाराची निविदा रद्द करून नव्याने निविदा काढण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

परतूर तालुक्यातील रामा ५४८ सी ते संकनपुरी-सावरगाव बुद्रुक ते गुंज आणि पांडेपोखरी-आसनगाव ते सावरगाव बुद्रुक अशा ६.५ किमी लांबीच्या रस्त्याचे काम ११.५ कोटी रुपयांच्या निधीतून मंजूर झाले आहे. या रस्त्यामध्ये पुलाचे बांधकाम देखील समाविष्ट आहे. कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतर कामाची सुरुवात होणे अपेक्षित होते, परंतु १६ महिन्यांचा कालावधी उलटूनही कंत्राटदाराने अद्याप काम सुरू केलेले नाही.

सावरगाव बुद्रुक, हे 'चतुर्वेदेश्वर सावरगाव' म्हणून ओळखले जाते. देशभरातून लाखो भाविक या ठिकाणी दर्शनासाठी येतात. परंतु, रस्ता खराब झाल्यामुळे त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. आष्टी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक उद्धवराव गुंजाळ यांनी सांगितले की, प्रवाशांचे हाल होत आहेतच, पण कंत्राटदारामुळे संपूर्ण गावाची देशभरात बदनामी होत आहे.

ग्रामस्थांनी आपल्या तक्रारीत अनेक गंभीर आरोप केले आहेत. यापूर्वी संबंधित कंत्राटदाराने इतर ठिकाणी केलेली कामेही निकृष्ट दर्जाची असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे, या कंत्राटदाराला तातडीने कामातून काढून टाकावे अशी मागणी त्यांनी केली आहे.

**रॉयल्टी आणि निकृष्ट कामाचे आरोप**

ग्रामस्थांनी दिलेल्या तक्रारीनुसार, या कामासाठी आवश्यक असलेले गौण खनिज (दगड, मुरुम, वाळू) घेण्यासाठी कंत्राटदाराने कोणतीही परवानगी घेतली नाही. तसेच, रॉयल्टी देखील भरलेली नाही. पुलाच्या कामासाठी वाळूऐवजी क्रशरची भुकटी वापरल्याचाही आरोप आहे, ज्यामुळे कामाची गुणवत्ता खराब होण्याची शक्यता आहे.

याचबरोबर, रस्त्याच्या दुतर्फा साईड पंखे भरण्यासाठी आवश्यक असलेले गौण खनिज वापरले नसून, जागेवरच काळी माती आणि दगड वापरले आहेत. ही बाबही अत्यंत गंभीर असून, कामात मोठी अनियमितता होण्याची शक्यता असल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे.

या कामांमध्ये वापरल्या जाणाऱ्या साहित्याची तपासणी छत्रपती संभाजीनगर येथील गुणनियंत्रण विभागाकडून केली जाते. ग्रामस्थांनी आरोप केला आहे की, या विभागात मोठा भ्रष्टाचार सुरू असून, योग्य तपासणी न करताच २% रक्कम घेऊन थेट प्रमाणपत्र दिले जाते. त्यामुळे, या कामाची तपासणी छत्रपती संभाजीनगर येथील विभागाकडून न करता नागपूर येथील गुणनियंत्रण विभागाकडून करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

या सर्व मागण्यांवर तातडीने कारवाई न झाल्यास मुख्य अभियंत्यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. या मागणी अर्जावर आष्टी बाजार समितीचे संचालक उद्धवराव गुंजाळ, सरपंच नवनाथ आयंदे यांच्यासह अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. त्यांनी या कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकून नव्याने निविदा काढण्याची मागणी केली आहे, जेणेकरून गावातील रस्त्याचे काम दर्जेदार होईल.

# माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांची जयंती 'सद्भावना दिन' म्हणून साजरी

**जालना । प्रतिनिधी -** माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांची जयंती 'सद्भावना दिन' म्हणून साजरी करण्यात येते. यानिमित्ताने जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना सद्भावना दिनाची सामुहिक प्रतिज्ञा दिली. यावेळी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, तहसीलदार अनिल नव्हाते व रंगराव मेंडके, नायब तहसीलदार तुषार निकम, सतिश तायडे, विक्रांत मोंढे, किशोर तायडे, रविंद्र हेलगर, अतुल केदार, संपदा कुलकर्णी, कुंता पठाडे यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## आजचे राशीभविष्य

**मेष** : आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला आहे. आर्थिक बाबतीत लाभ होण्याची शक्यता आहे. नोकरी किंवा व्यवसायात प्रगती कराल. कुटुंबासोबत वेळ घालवल्याने आनंद मिळेल.

**वृषभ** : तुम्हाला काही कामांमध्ये यश मिळवण्यासाठी अधिक मेहनत घ्यावी लागेल. आरोग्याची काळजी घ्या. खर्चावर नियंत्रण ठेवा, अन्यथा आर्थिक समस्या येऊ शकतात.

**मिथुन** : आजचा दिवस तुमच्यासाठी फलदायी ठरेल. नवीन संधी मिळतील आणि जुनी कामे मार्गी लागतील. मित्रांचे सहकार्य मिळेल. प्रवास होण्याची शक्यता आहे.

**कर्क** : तुम्ही घेतलेले महत्त्वाचे निर्णय योग्य ठरतील. व्यवसायात यश मिळेल. कुटुंबातील सदस्यांसोबतचे संबंध सुधारतील. शांत आणि संयमी राहणे फायदेशीर ठरेल.

**सिंह** : आज तुम्हाला तुमच्या कामात यश मिळेल. तुमचे नेतृत्वगुण दिसून येतील. प्रेमसंबंधात असलेल्यांसाठी दिवस चांगला आहे. आरोग्याची काळजी घ्या.

**कन्या** : काही गोष्टींमुळे तणाव जाणवू शकतो. कोणतेही मोठे निर्णय घेण्यापूर्वी विचार करा. खर्चावर लक्ष ठेवा. आरोग्याच्या बाबतीत निष्काळजीपणा टाळा.

**तुळ** : आजचा दिवस तुमच्यासाठी शुभ आहे. महत्त्वाच्या कामांमध्ये यश मिळेल. नातेवाईकांकडून मदत मिळू शकते. आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक** : तुमच्या कामामुळे तुम्हाला ओळख मिळेल. व्यवसायात यश मिळेल आणि नवीन संधी मिळतील. कुटुंबातील सदस्यांसोबतचे संबंध चांगले राहतील.

**धनु** : प्रवासामुळे थोडा थकवा जाणवू शकतो. आर्थिक बाबींमध्ये काळजी घ्या. कोणतेही मोठे व्यवहार करण्यापूर्वी विचार करा. संयम ठेवणे महत्त्वाचे आहे.

**मकर** : आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला आहे. नवीन काम सुरू करण्यासाठी दिवस योग्य आहे. मेहनतीचे फळ मिळेल. आर्थिक स्थिती मजबूत होईल.

**कुंभ** : कामाच्या ठिकाणी तुम्हाला यश मिळेल. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून प्रशंसा मिळेल. मित्रांसोबत चांगला वेळ जाईल. आरोग्याची काळजी घ्या.

**मीन**: आज तुम्हाला तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कोणत्याही वादापासून दूर राहा. कुटुंबासोबत वेळ घालवणे फायदेशीर ठरेल. आर्थिक व्यवहार करताना सावध रहा.

# जालन्याच्या जैन विद्यालयाची बालरंगभूमी स्पर्धेत बाजी

## दोन विद्यार्थ्यांची अंतिम फेरीसाठी निवड

**जालना । प्रतिनिधी -** अखिल भारतीय नाट्य परिषद संलग्न संस्था असलेल्या बालरंगभूमी परिषद, जालना शाखेने आयोजित केलेल्या 'इतिहास महाराष्ट्राचा' या नाट्य स्पर्धेत श्री म.स्था. जैन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत दोन विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक पटकावत आपली निवड अंतिम फेरीसाठी निश्चित केली आहे, जी मुंबई येथे होणार आहे.

या प्राथमिक फेरीमध्ये जैन माध्यमिक विद्यालयातील इयत्ता दहावीचा विद्यार्थी सोहम अशोक वाटसर आणि त्याच्या संघाने उत्कृष्ट सादरीकरण करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यांच्या अभिनयाला आणि कथेला परीक्षकांनी विशेष दाद दिली.

त्याचप्रमाणे, इयत्ता आठवीची विद्यार्थिनी आराध्या विजय कोल्हे हिने आपल्या अभिनयाच्या जोरावर द्वितीय क्रमांक मिळवून यश मिळवले आहे. या दोन्ही विद्यार्थ्यांची निवड आता अंतिम फेरीसाठी झाली असून, ते लवकरच मुंबई येथे होणाऱ्या स्पर्धेत आपल्या शाळेचे आणि जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील.

या निवडीबद्दल अध्यक्ष सुदेशकुमार सकलेचा, उपाध्यक्ष भरत गादिया, महामंत्री डॉ. धरमचंद गादिया, सहसचिव कचरूलाल कुंकलोळ, कोषाध्यक्ष संजय लुणावत विश्वस्त नेमीचंदजी रुणवाल संजयकुमार मुथा डॉ. गौतमचंद रुणवाल, संजय बंब, प्रकाशचंद सुराणा, शांतीलाल संचेती, शालेय समितीचे अध्यक्ष जितेशकुमार भायानी, उपाध्यक्ष विजयकुमार भंडारी, सचिव कांतीलाल कुंकलोळ, कोषाध्यक्ष विजयकुमार नहार सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक एस.एम. वानगोता पर्यवक्षक श्रीमती सोमानी, श्री शिंदे, व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



या यशात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे सहशिक्षक एस. बी. चव्हाण यांचेही सर्वांनी विशेष अभिनंदन केले. त्यांच्या या कामगिरीमुळे जैन विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

# न्यू वंडर इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**परतूर । प्रतिनिधी -** देवगिरी ग्लोबल इंग्लिश स्कूल परतुर येथे दिनांक १९ ऑगस्ट २०२५ मंगळवार रोजी पार पडलेल्या जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रिडा परिषद जालना आयोजित परतूर तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत न्यू वंडर इंग्लिश स्कूलच्या मयूर योगेश शेरे, कार्तिकी महादेव शेरे, काव्यांजली पांडुरंग सोळंके हया तिन विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करुन जिल्हा स्तरावर होणाऱ्या स्पर्धेसाठी ते पात्र ठरले आहेत. या निवडीबद्दल



संस्थेचे अध्यक्ष, नारायणदादा सोळंके. कार्याध्यक्ष, गणेश सोळंके. सचिव, छाया बागल. क्रिडा शिक्षक, रोहित जैस्वाल. शिक्षक, गोविंद पाठक, संतोष हरकळ, महादेव कदम, दिनेश साठे. गोपीनाथ जगदाळे, ऐहतेशाम खान, अभिषेक आरसाड, सुरेखा ताजी, पुजा मोरे, दामिनी टाकणखार, राधिका चव्हाण, शारदा चव्हाण, मंगला वेडेकर, शालू पारखे, ज्योतिका जगताप. ताहिरा शेख, व इतर कर्मचारी वृंदानि अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

पान १ वरुन

## कार्यकर्ता हा ...

अकाली निधनामुळे आपण देशाच्या अत्यंत प्रतिभावान व कदाचित पंतप्रधान पदापर्यंत पोहोचू शकणाऱ्या नेत्याला मुकलो, असेही आमदार लोणीकर यावेळी म्हणाले.

पुढे बोलताना आमदार बबनराव म्हणाले की, स्वर्गीय विमलताई मुंदडा यांच्यासोबतही आपण विधिमंडळात काम केले असून त्यांचा सर्वसामान्यांच्या विकासाचा वसा आणि वारसा संघर्ष कन्या पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात आमदार नमिता ताई मुंदडा यांच्या रूपाने आजही केज विधानसभा मतदारसंघाच्या माध्यमातून राबवला जात आहे ही अत्यंत आनंदाची बाब आहे. यावेळी सचिन दाभाडे, राजेंद्र पवार, उद्धव रासकर, विनायक रत्नपारखी, रूपाली कचरे, अभिजीत सोळुंके, संदीप काचगुडे, संजय गंभीरे, गोकुळ कदम, भगवान केदार, संदीप पाटील, वसंत निर्मळ, राजेश गीते, संतोष भगत, मनोज पाटील, अशोक लोढा, अशोक रसाळ, राणा डोईफोडे यांच्यासह लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## गुरुवार (दि २१) दिवसभरात ...

### मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली दुष्काळ पॅकेजवर चर्चा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीवर गंभीर चर्चा झाली. मराठवाडा आणि विदर्भात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकरी संकटात सापडले आहेत. मंत्रिमंडळाने या भागातील शेतकऱ्यांसाठी तातडीने आर्थिक मदत पॅकेज जाहीर करण्यावर सहमती दर्शवली आहे.

### कृषी आणि ग्रामीण विकास

राज्याच्या अनेक भागांत पावसाने ओढ दिल्याने शेतकरी चिंतेत आहेत. सरकारने तातडीने मदत जाहीर करण्याची मागणी जोर धरत आहे. मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचे प्रमाण समाधानकारक नसल्याने पिकांची स्थिती गंभीर झाली आहे.

### विरोधकांकडून सरकारवर टीका

विरोधी पक्षांनी राज्यातील वाढती महागाई, बेरोजगारी आणि शेतकरी आत्महत्यांच्या मुद्द्यांवरून सरकारवर जोरदार टीका केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयंत पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन सरकार केवळ घोषणा करत असल्याचा आरोप केला, तर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यात मदत जमा करण्याची मागणी केली.

### आगामी निवडणुकीची रणनीती

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी आपली रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. भाजपच्या प्रदेश कार्यकारिणीची बैठक मुंबईत झाली, तर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनी संयुक्त बैठका घेऊन आघाडीच्या जागावाटपावर चर्चा केली.

### विकासकामांवरून आरोप-प्रत्यारोप

जालना जिल्ह्यात रस्त्यांच्या कामांमधील अनियमिततेवरून भाजपनेच आपल्या सरकारवर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला आहे. तसेच, मुंबईतील विकासकामांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत.

### नेत्यांच्या दौऱ्यांची धामधूम

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरांना भेट देऊन विविध विकासकामांचा आढावा घेतला. तर, विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागांचा दौरा करून शेतकऱ्यांशी संवाद साधला.

### गुन्हे आणि कायदा-सुव्यवस्था

मुंबईत एका मोठ्या ड्रग्स रॅकेटचा पर्दाफाश करण्यात आला असून, काही परदेशी नागरिकांना अटक करण्यात आली आहे. या घटनेमुळे शहराच्या सुरक्षा व्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, जालना जिल्ह्यात एका निवृत्त मुख्याध्यापकाला तोतया पोलिसांनी लुटल्याची घटना समोर आल्याने पोलीस प्रशासनावर टीका होत आहे.

### विकास प्रकल्प

मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वे वरील नवीन लेनचे काम प्रगतीपथावर आहे. या कामामुळे वाहतूक कोंडी कमी होण्याची अपेक्षा आहे. तसेच, नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर अपघातांची वाढती संख्या चिंतेचा विषय बनली असून, यावर उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

### शिक्षण आणि आरोग्य

राज्यातील अनेक जिल्ह्यांत शाळांमध्ये स्वच्छता मोहीम सुरू करण्यात आली आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शाळा आणि महाविद्यालयांनी विशेष कार्यक्रम आयोजित केले आहेत. आरोग्याच्या दृष्टीने, सरकारी रुग्णालयांमध्ये औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्याबाबत सरकारने निर्देश दिले आहेत.

# कार्यकर्ता हा भारतीय जनता पक्षाचा प्राण; प्रतिभावान, जिवलग व बलाढ्य कार्यकर्त्यांच्या बळावरच मुंडे - महाजनानी पक्ष उभा केला

## माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन; देवाभाऊंसाठी पाठवलेल्या राख्यांच्या संकलनासाठी आमदार लोणीकर अंबाजोगाईत



**परतूर । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा पक्ष असून सर्व सामान्य शाखाध्यक्ष पासून देशाच्या राष्ट्रीय अध्यक्षच्या पदापर्यंत व सर्व सामान्य ग्राम पंचायतच्या सदस्या पासून देशाच्या पंतप्रधानापर्यंत आपल्या कार्य कौशल्याच्या बळावर पोहोचण्याची ताकद केवळ भारतीय जनता पक्षामध्ये आहे. त्यामुळे भारतीय जनता पक्षाची ताकद आणि प्राण कार्यकर्ता आहे. सर्वसामान्य कार्यकर्त्याच्या बळावर भाजपा जगातील सर्वात मोठा पक्ष बनला आहे. याच प्रतिभावान, जिवलग व बलाढ्य कार्यकर्त्यांच्या बळावर स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे व प्रमोद जी महाजन यांनी महाराष्ट्रात पक्ष उभा केला त्यामुळे भविष्यात देखील काम करणाऱ्या कार्यकर्त्याला बळ देणारा केवळ एकमेव पक्ष असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

आंबेजोगाई येथे बीड जिल्ह्यातील माझा भाऊ, देवा भाऊ या उपक्रमांतर्गत राख्यांचे संकलन कार्यक्रम प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. यावेळी मंचावर ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, भाजपा बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, युवा नेते अक्षय मुंदडा, राम कुलकर्णी भाजपा महिला जिल्हाध्यक्ष उषा मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे व प्रमोद महजन यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या जिल्ह्यातील भारतीय जनता पार्टीतील नेत्यांची फळी निर्माण झालेली आहे. तळागाळातील सर्व सामान्य व्यक्तीपर्यंत केंद्र व राज्य सरकारच्या योजना पोहोचविण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते सदैव तत्पर असतात. १ राखी पंकजाताईंनी प्रत्यक्ष 'देवाभाऊ' यांना बांधलेली आहे तर बीड जिल्ह्यातून पहिल्या टप्प्यात जमा झालेल्या १५५७० राख्या आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत पोहोच करणार आहोत असेही लोणीकर यावेळी म्हणाले.

महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र व राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजना मोठ्या प्रमाणात राबवल्या जात आहेत त्यामध्ये राज्य सरकारच्या वतीने देखील राज्यातील महिलांसाठी अनेक प्रभावी योजना राबवल्या गेल्या आहेत त्यामध्ये उज्वला गॅस योजने पासून लाडकी बहीण योजनेपर्यंत अनेक योजनांचा उल्लेख करता येईल. महाराष्ट्र सरकारने व भारतीय जनता पार्टीचे पदाधिकाऱ्यांनी घरोघरी जाऊन या योजना सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवले आहेत त्याविषयी स्वराज्यातील माता-भगिनींचे मत जाणून घेण्यासाठी भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने रक्षाबंधन कार्यक्रमानिमित्त माझा भाऊ, देवा भाऊ हे महाअभियान संपूर्ण राज्यभर राबविण्यात आले होते. त्यामध्ये लाभार्थी महिलांचे लाभ घेतलेल्या योजनेबद्दल व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बद्दलचे मत विचारात घेण्यात आले होते त्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भावाप्रमाणे पाठीशी उभे राहिले ही भावना व्यक्त करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राखी पाठवण्याच्या उपक्रम हाती घेण्यात आला होता असे प्रतिपादन माजीमंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

पक्षाच्यावतीने आयोजित माझा भाऊ, देवाभाऊ राखी संकलन कार्यक्रमादरम्यान आमदार बबनराव लोणीकर यांनी बीड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांशी संवाद साधताना स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांची आठवण काढताच कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला व प्रचंड टाळ्यांच्या कडकडात लोणीकरांच्या भाषणाला सुरुवात झाली. पुढे बोलताना लोणीकर म्हणाले की भारतीय जनता पक्षाच्या दृष्टीने आंबेजोगाई हे स्वर्गीय प्रमोद महाजनांसारखे प्रतिभावान नेतृत्व देणारे शहर आहे. दुर्दैवाने महाजन साहेबांच्या पान ३ वर

# जिल्हास्तरीय शालेय किकबॉक्सिंग स्पर्धेत जालना 'साईन कराटे-डु' चा डंका

## सात खेळाडूंची विभागीय स्तरासाठी निवड

**जालना । प्रतिनिधी** - जिल्हास्तरीय शालेय किकबॉक्सिंग स्पर्धेत जालना येथील 'साईन कराटे-डु' च्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली. स्पर्धेतील विविध वयोगटांमध्ये एकूण सात खेळाडूंनी प्रथम क्रमांक पटकावत विभागीय शालेय किकबॉक्सिंग स्पर्धेत जालना जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळवली आहे. ही स्पर्धा २० ऑगस्ट, २०२५ रोजी पार पडली. या यशाबद्दल सर्व खेळाडूंचे कौतुक होत आहे.



विजेत्यांमध्ये प्रथम क्रमांक (विभागीय स्पर्धेसाठी पात्र) प्रशिक राऊत (किड्स केंब्रिज स्कूल) - अंडर-१४, २८ किलो वजन गट.

शेलमोन गुडेकर (जे.ई.एस. कॉलेज) - अंडर-१९, ५० किलो वजन गट. कु. आराध्या खत्ती (ऋषी इंग्लिश स्कूल) - अंडर-१४, ३२ किलो वजन गट. कु. वैष्णवी लुटे (आर.एच.व्ही. स्कूल) - अंडर-१७, ५५ किलो वजन गट. कु. अश्विनी आजगे (श्री गणपती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय) - अंडर-१९, ४५ किलो वजन गट. कु. तेजल भागडे (जे.ई.एस. कॉलेज) - अंडर-१९, ६३ किलो वजन गट. कु. पूर्वा माने (श्रीमती इंदिरा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय) - अंडर-१९, +६३ किलो वजन गट. या सर्व खेळाडूंनी कठोर परिश्रम घेत प्रथम क्रमांक पटकावला आणि आता ते विभागीय स्तरावर आपल्या जिल्ह्याचे नाव रोशन करतील अशी अपेक्षा आहे.

द्वितीय क्रमांक (द्वितीय स्थान): या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवूनही 'साईन कराटे-डु' च्या खेळाडूंनी आपली गुणवत्ता सिद्ध केली. कु. प्राजक्ता राऊत (किड्स केंब्रिज स्कूल) - अंडर-१७, ४५ किलो वजन गट. कु. दिव्यता कोठारी (श्री म. स्था. जैन इंग्लिश स्कूल) - अंडर-१७, ५५ किलो वजन गट. कु. आरुषी वल्लकट्टी (नारायणा ई-टेक्नो स्कूल) - अंडर-१७, ५० किलो वजन गट. कु. लावण्या गुडला (जे.ई.एस. कॉलेज) - अंडर-१९, ४८ किलो वजन गट.

तृतीय क्रमांक (तृतीय स्थान): कु. तनवी खरटमल (नारायणा ई-टेक्नो स्कूल) - अंडर-१७, ३५ किलो वजन गट. ओंकार गुट्टे (नवयुवक गणेश विद्यालय) - अंडर-१७, ५५ किलो वजन गट.

**प्रशिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन** या सर्व खेळाडूंच्या यशात प्रशिक्षक सेन्साई रुपेंद्र पारचा आणि सेन्साई अमन पारचा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच खेळाडूंनी हे यश संपादन केले.

या स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या सर्व खेळाडूंचे महावी ढक्का, क्रीडा अधिकारी सिद्धार्थ कदम, राजेश राऊत, संजय भगत, रितेश अग्रवाल, एस.एम.एस. जैन विद्यालयाचे मुख्याध्यापक वानगोता सर, एस.एम.एस. जैन प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका पोरवाल मॅडम, नारायणा शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना पवार, व्यंकट राजू गुडला, यादवजी बापू, प्रशांत प्रेमभारती, रितेश जयस्वाल, गणेश श्रीराम तसेच पालक वर्गांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. या खेळाडूंमुळे जालना जिल्ह्याचे नाव आता विभागीय स्तरावर गाजणार आहे.

# मंठा तालुक्यात १० कोटींच्या रस्त्याचे काम बोगस

## सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांकडे तक्रारींचा पाऊस

**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यातील टकले पोखरी - जयपूर त्रिफुली व जयपूर - बेलोरा या १० किलोमीटरच्या महत्त्वाच्या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. अवघ्या सहा महिन्यांतच रस्ता उखडल्याने संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष राजेश मोरे यांच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे तक्रार केली आहे. या कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत, योग्य कारवाई न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे.

ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीनुसार, १० कोटी रुपयांच्या या रस्त्यासाठी कंत्राटदाराने अनेक नियम पायदळी तुडवले आहेत.

रस्त्यासाठी आवश्यक असलेला दगड, मुरुम आणि वाळू कुठल्याही नोंदणीकृत खाणीतून आणलेला नाही. यामुळे शासनाची रॉयल्टी बुडवण्यात आली आहे.

पुलाच्या कामासाठी वाळूऐवजी क्रशरमधून निघणारी भुकटी वापरण्यात आली. तसेच, रस्त्याचे सोलिंग अनेक ठिकाणी व्यवस्थित केलेले नाही.

रस्त्याच्या दुतर्फा साईड पंखे भरण्यासाठी मुरूम किंवा दगड वापरणे अपेक्षित होते, परंतु कंत्राटदाराने केवळ काळ्या मातीचा आणि स्थानिक दगडांचा वापर केला.

नियमांनुसार गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांना जीपीएस मशीन लावणे आवश्यक आहे. मात्र, कंत्राटदाराने या नियमाचे पालन केले नाही. यावर ५१% दंड आकारण्याची तरतूद असूनही अधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई केली नाही.

**गुणनियंत्रण विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**

ग्रामस्थांनी थेट छत्रपती संभाजीनगर येथील गुणनियंत्रण विभागावरही (Quality Control) गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी म्हटले आहे की, प्रत्यक्ष जागेवरच्या साहित्याची तपासणी न करता, केवळ २% रक्कम घेऊन थेट कामाला प्रमाणपत्र दिले जात आहे. त्यामुळे या प्रकरणात मोठ्या भ्रष्टाचाराचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. ग्रामस्थांनी ही चौकशी छत्रपती संभाजीनगर ऐवजी नागपूरच्या गुणनियंत्रण विभागाकडून करण्याची मागणी केली आहे.




# परतूर शहरातील बैलपोळा सणानिमित्त मुख्य बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर शहरातील मुख्य बाजारपेठेत बैलपोळा सणानिमित्त आज दिवसभर गजबजलेले वातावरण पाहायला मिळाले. सकाळपासूनच शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिक आपल्या बैलांसाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी मोठ्या संख्येने बाजारात दाखल झाले होते. यामध्ये बैलांच्या सजावटीसाठीची नक्षीदार जीन, पाटा, लंगोट, नवे रंगीबेरंगी दोरे, घंटा, सोन्याच्या व चांदीच्या पेंटिंगने सजवलेल्या डोक्याच्या पट्ट्या तसेच नवीन नांगर, कुऱ्हाड, फावडी यांसारखी शेतीची साधने खरेदी करण्यासाठी मोठी गर्दी झाली. पोलिसांनी देखील बाजारपेठेतील सुरळीत वाहतूक व्यवस्थेसाठी विशेष पथक तैनात केले होते. ग्रामीण भागातील शेतकरी आपल्या बैलांसह शहरात आले होते. बैलांच्या अंगावर सुंदर रंगकाम, मोरपिसांच्या सजावटीसह त्यांची मिरवणूक देखील अनेक ठिकाणी पाहायला मिळाली. सणाच्या निमित्ताने मिठाई दुकाने, पशुखाद्य दुकाने आणि रंगसाहित्य विक्रेत्यांकडेही ग्राहकांची गर्दी होती. विशेष म्हणजे यावर्षी साहित्यांच्या किमतीत थोडी वाढ झाल्याचे काही ग्राहकांनी सांगितले असले तरीही खरेदीत कोणतीही कमी झालेली नाही. एकूणच, परतूर शहर आज बैलपोळ्याच्या उत्साहात रंगलेले असून, बाजारपेठेत खरेदीचा जल्लोष आणि आनंदाचे वातावरण आहे



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.